दि.६ जुलै, २००९ च्या शासन निर्णयान्वये
अकृषि विद्यापीठातील शिक्षकेतर पदांच्या
निश्चित करण्यात आलेल्या आकृतीबंधानुसार
पदनिहाय मंजूरी देणे बाबत.............
**सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.**

**महाराष्ट्र शासन**
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्र. एसयुएस २००९/(३९०/०९)/विशि-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२. दिनांक :- १९ सप्टेंबर, २००९.

**वाचा :** (१) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.असक-१००१/प्र.क्र.२९/२००१/वित्तीय सुधारणा,दि.१०.९.२००१.
(२) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.असक-१००१/प्र.क्र.२९(भाग-६)/२००४/वित्तीय सुधारणा, दिनांक १.७.२००४.
(३) शासन निर्णय क्र.संकीर्ण २००७/(१२२/०७)/विशि-प्रशा, दिनांक ६ जुलै, २००९.
(४) सोलापूर विद्यापीठाचे क्र.सोविसो/आस्था/२००९-१०/३४८६, दिनांक १० सप्टेंबर, २००९ चे पत्र.

**प्रस्तावना :-** वित्त विभागाने संदर्भाधीन क्र.१ येथील दि.१०.९.२००१ च्या शासन निर्णयान्वये पदांचा आढावा घेऊन आकृतिबंध निश्चित करावे व आकृतिबंध अंतिम झाल्याशिवाय रिक्त पदे भरु नयेत असे सर्व प्रशासकीय विभांगाना आदेशित केले. वित्त विभागाच्या वरील निर्णयानुसार राज्यातील सर्व अकृषि विद्यापीठाच्या शिक्षकीय व शिक्षकेतर पदांचा आढावा घेऊन आकृतिबंध निश्चित करण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर प्रक्रियेला लागणारा विलंब लक्षात घेता शासनाने संदर्भाधीन क्र.२ येथील दिनांक १ जुलै, २००४ च्या शासन निर्णयान्वये मागासवर्गीय प्रवर्गांची ९०% व खुल्या प्रवर्गाची ५०% रिक्त पदे भरण्याची मुभा दिली. अशी सूट देऊनही अपुऱ्या मनुष्यबळामुळे विद्यापीठाच्या कामावर विपरीत परिणाम होत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले. वित्त विभागाच्या दि.१०.९.२००१ च्या निर्णयामुळे एका बाजुला सन २००१ रोजी अस्तित्वात असलेली रिक्त पदे भरता आली नाहीत, तर दुसऱ्या बाजुला सन २००१ नंतर वाढलेल्या कामासाठी आवश्यक पदांच्या बाबतीत सुध्दा निर्णय घेता आला नाही. दरम्यानच्या काळामध्ये मा.मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाने याचिका क्र.८०६७/२००६ मध्ये दि.०६-०४-२००९ रोजी व नागपूर खंडपीठ यांनी सुमोटो याचिका क्र.२२१६/२००६ मध्ये दि.३-१२-२००८ रोजी राज्यातील शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी राज्य शासनाने आवश्यक ती पावले उचलावीत व विद्यापीठाचा आकृतिबंध त्वरीत निश्चित करावा असे आदेशित केले. विद्यापीठातील अपुऱ्या मनुष्यबळामुळे शिक्षणावर होणारा संभाव्य दुष्परिणाम व मा.उच्च न्यायालयाचे वरील आदेश विचारात घेता, **संदर्भाधीन क्र.३ येथील दिनांक ६-७-२००९ च्या शासन निर्णयान्वये ९ अकृषि विद्यापीठांच्या शिक्षकेतर पदांचा आकृतीबंध निश्चित करण्यात आला आहे.**

२.	सदर दि.६-७-२००९ च्या शासन निर्णयान्वये विद्यापीठांसाठी गटनिहाय पदे मंजूर करण्यात आली असून त्यामध्ये सोलापूर विद्यापीठासाठी एकूण २१० पदे मंजूर करण्यात आली आहेत. त्यामध्ये यापूर्वी मंजूर करण्यात आलेल्या १५० पदांचा समावेश आहे. सदर २१० पदांची वर्गवारी गट-अ-१५, गट-ब-१३, गट-क-११५ आणि गट-ड-६७ अशी आहे.

२.२	संदर्भाधीन क्र.३ येथील शासन निर्णयामधील परिच्छेद ७ मध्ये विद्यापीठांनी पदनिहाय सविस्तर प्रस्ताव सादर करावा असे सूचित करण्यात आले. त्यानुसार सोलापूर विद्यापीठाने संदर्भ क्र.४ येथील दि.१०-०९-२००९ च्या पत्रामध्ये सविस्तर पदनिहाय प्रस्ताव शासनास सादर केला आहे. त्यानुसार सदर विद्यापीठाच्या शिक्षकेतर पदांच्या पदनिहाय आकृतीबंधासंदर्भात खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

## शासन निर्णय

३.	सोलापूर विद्यापीठ, सोलापूर या विद्यापीठासाठी संदर्भाधीन क्र.३ येथील दिनांक ६-७-२००९ च्या शासन निर्णयान्वये एकूण २१० शिक्षकेतर पदांच्या ज्या आकृतीबंधास शासन मान्यता देण्यात आलेली आहे **त्याचा पदनिहाय तपशील आता सोबतच्या प्रपत्र "अ" मध्ये दर्शविल्याप्रमाणे मान्य करण्यात येत आहे.**

४.	या शासन निर्णयासोबत जोडलेल्या प्रपत्रातील रिक्त पदे संदर्भाधीन क्र.३ येथील दि.६-७-२००९ च्या शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून भरण्यात यावीत.

५.	तसेच सोबतच्या प्रपत्र "ब" मधील स्तंभ क्र.२ मध्ये दर्शविलेल्या पदावरील (स्तंभ क्र.४ मध्ये दर्शविल्याप्रमाणे एकूण ५) कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतर ते पद निरसीत करुन त्याऐवजी स्तंभ क्र. ३ मध्ये दर्शविलेल्या पदनामाप्रमाणे ५ पदांच्या संख्येत कोणताही बदल न करता सदर पदे भरण्यास मान्यता देण्यात येत आहे.

५.	हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. २७०/०९ विसु-१ दि. २/५/२००९ अन्वये आणि उच्चस्तरीय सचिव समितीच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

६.	हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक क्रमांक २००९०९१९१२३७१०००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

सही/-

(विकास तु. कदम)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.राज्यपाल तथा कुलपती यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,

२) मा. कुलगुरु, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर,

३) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई,
५) महालेखापाल (लेखा परिक्षा) महाराष्ट्र, मुंबई,
६) विभागीय सह संचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग, सोलापूर.
७) कुलसचिव, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर,
८) जिल्हा कोषाधिकारी, पुणे,
९) जिल्हा कोषाधिकारी, सोलापूर
१०) वित्त विभाग
११) निवड नस्ती, विशि (प्रशा)

**(शासन निर्णय क्रमांक एसयुएस-२००९/(३९०/०९)/विशि-१, दिनांक १९ सप्टेंबर, २००९ चे सहपत्र)**

**प्रपत्र - अ**

**सोलापूर विद्यापीठासाठी आकृतीबंधानुसार मंजूर करण्यात आलेल्या शिक्षकेतर पदांची पदनिहाय यादी**

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | मंजूर पद संख्या |
|---|---|---|---|
| | **गट - अ** | | |
| १. | उपकुलसचिव | १०६५०-१५८५० | ०४ |
| २. | सिस्टीम अनॉलिस्ट | १०६५०-१५८५० | ०२ |
| ३. | विद्यापीठ अभियंता | १०६५०-१५८५० | ०१ |
| ४. | सहायक कुलसचिव | ८०००-२७५-१३५०० | ०६ |
| ५. | कायदा अधिकारी | ८०००-२७५-१३५०० | ०१ |
| ६. | वैद्यकिय अधिकारी | ८०००-२७५-१३५०० | ०१ |
| | | **एकूण** | **१५** |
| | **गट - ब** | | |
| ७. | कक्ष अधिकारी | ६५००-२००-१०५०० | १० |
| ८. | लेखापाल | ६५००-२००-१०५०० | ०१ |
| ९. | कनिष्ठ अभियंता | ६५००-२००-१०५०० | ०१ |
| १०. | प्रोग्रामर | ६५००-२००-१०५०० | ०१ |
| | | **एकूण** | **१३** |
| | **गट - क** | | |
| ११. | सहायक कक्ष अधिकारी | ५५००-१७५-९००० | ११ |
| १२. | सांख्यिकी सहायक | ५५००-१७५-९००० | ०१ |
| १३. | वरिष्ठ ग्रंथालय सहायक | ५५००-१७५-९००० | ०३ |
| १४. | लघुलेखक | ५५००-१७५-९००० | ०४ |
| १५. | कंपाऊंडर (मिश्रक) | ४५००-१२५-७००० | ०१ |
| १६. | भांडारपाल | ४५००-१२५-७००० | ०३ |
| १७. | वरिष्ठ लिपिक | ४०००-१००-६००० | २२ |
| १८. | लघुटंकलेखक | ४०००-१००-६००० | ०३ |
| १९. | प्रयोगशाळा सहायक | ४०००-१००-६००० | १२ |
| २०. | कनिष्ठ लिपिक | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० | ५० |
| २१. | रेकॉर्ड कीपर-नि-लिपिक | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० | ०१ |
| २२. | दुरध्वनी चालक | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० | ०१ |
| २३. | तारतंत्री | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० | ०१ |
| २४. | सुतार | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० | ०१ |
| २५. | नळकारागीर | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० | ०१ |
| | | **एकूण** | **११५** |

| | | | |
|---|---|---|---|
| | **गट - ड** | | |
| २६. | प्रयोगशाळा परिचर | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० | १२ |
| २७. | ग्रंथालय परिचर | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० | ०३ |
| २८. | वाहन चालक | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० | ०५ |
| २९. | जमादार | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० | ०१ |
| ३०. | हवालदार | २६१०-६०-२९१०-६५-३३००-७०-४००० | ०१ |
| ३१. | झेरॉक्स ऑपरेटर | २५५०-५५-२६६०-६०-३२०० | ०२ |
| ३२. | चौकीदार(सेवानिवृत्तीनंतर शिपाई पदनामाने पद भरावे) | २५५०-५५-२६६०-६०-३२०० | ०३ |
| ३३. | शिपाई | २५५०-५५-२६६०-६०-३२०० | ३८ |
| ३४. | स्वच्छक (सेवानिवृत्तीनंतर शिपाई पदनामाने पद भरावे) | २५५०-५५-२६६०-६०-३२०० | ०२ |
| | | **एकूण** | **६७** |
| | | **एकूण (गट - अ + ब + क + ड )** | **२१०** |

**(शासन निर्णय क्रमांक एसयुएस-२००९/(३९०/०९)/विशि-१, दिनांक १९ सप्टेंबर, २००९ चे सहपत्र)**

**प्रपत्र-ब**

**सोलापूर विद्यापीठासाठी मंजूर आकृतीबंधानुसार सेवानिवृत्तीनंतर निरसीत करून त्याऐवजी वेगळ्या पदनामाने भरावयाच्या पदांचा तपशील**

| अ.क्र. १. | पदनाम २. | सेवानिवृत्तीनंतरचे पद ३. | पदसंख्या ४. | वेतनश्रेणी ५. |
|---|---|---|---|---|
| १. | चौकीदार | शिपाई | ०३ | २५५०-३२०० |
| २. | स्वच्छक | शिपाई | ०२ | २५५०-३२०० |
| | | एकूण..... | ०५ | |